# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** पाथर्डी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0375 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**05/04/2025 05:32

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 04/04/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 04/04/2025
**Time From (वेळेपासून):** 13:26 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:26 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 05/04/2025 **Time (वेळ):** 04:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/04/2025 05:32 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** उपविभागीय अधिकारी कार्यालय,पाथ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a)**Name (नाव):** का◌ी मसुद खलील

(b)**Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण **(**राशन कार्ड **,**मतदाता कार्ड **,**पासपोर्ट**,** यूआईडी सं.**,** ड्राइविंग लाइसेंस**,** पॅन कार्ड **)**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ईदगाह मैदान,षेवगाव,ताषेवगाव,पाथर्डी,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ईदगाह मैदान,षेवगाव,ताषेवगाव,पाथर्डी,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9765910123

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अभिशेक दत्तात्रय जगताप | | | 1. राषास्त्रीनगर, षेवगांव,,पाथर्डी, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

पाथर्डी,जिल्हा-अहिल्यानगर

दि.05/04/2025.

मी काझी मसुद खलील, वय-41 वर्षे,व्यवसाय-षेती,रा.ईदगाह मैदान,षेवगाव,ता.षेवगाव,जि.अहिल्यानगर,मो.नं. 9765910123.

समक्ष फिर्याद देतो की,मी वरील ठिकाणचा रहिवाषी असुन मी दि.03/04/2025 रोजी पोलीस निरीक्षक श्री. आल्हाट,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर यांना फोन करून मला एका खाजगी इसमाकडुन एका लोकसेवकाकरीता लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली. त्यावेळी पोनि आल्हाट यांनी मला दिनांक 04/04/2025 रोजी पाथर्डी येथे सुरक्षित ठिकाणी उपस्थित राहण्यास सांगितले. त्यानुसार दि.04/04/2025 रोजी दुपारी 12:00 वाजेचे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, अहिल्यानगर चे अधिकारी व कर्मचारी हे पाथर्डी येथे मी थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी आले. सदर ठिकाणी पोनि आल्हाट यांनी माझा परिचय करुन घेतला तसेच आम्हाला त्यांचा व त्यांचे सोबतचे कर्मचारी, दोन षासकीय पंचाचा परिचय करुन दिला.

त्यानंतर मी पोनि श्री.आल्हाट यांचे सुचनेवरुन षासकीय वाहनात बसलो व दोन षासकिय पंचासमक्ष तक्रार सांगितली की," माझ्याकडे एम एच 12,डी.टि.1140 नंबरचे डंपर वाहन असुन त्याने मी मुरूम वाहतुकीचा व्यवसाय करत होतो.दिनांक 30/07/2023 रोजी मी नमुद डंपरने मुरूम वाहतुक करत असताना षेवगाव पोलीसांनी माझे डंपर वाहन पकडुन तहसिलदार षेवगाव यांचेकडे पुढील कारवाई करीता दिलेले होते त्यावेळी तहसिलदार षेवगाव यांनी दंडात्मक कारवाई करून माझे डंपरवर 2,36,300/- रूपयांचा दंड आकारला होता. सदरचा डंपर तहसिलदार षेवगाव यांनी लिलावात काढल्याने दिनांक 25/03/2025 रोजी मी चलनाद्वारे माझे डंपरवरील दंडाची रक्कम 2,36,300/- रूपये चलनाद्वारे भरलेली आहे व त्यानंतर तहसिलदार षेवगाव यांनी माझे डंपर वाहन सोडण्याकरीता आदेष होणेबाबतचे पत्र उपविभागीय अधिकारी,पाथर्डी भाग पाथर्डी यांना दिलेले होते व माझे डंपर वाहन सोडण्याचा अंतिम आदेष मिळणेवर माझे प्रकरण उपविभागीय अधिकारी पाथर्डी भाग यांचे कार्यालयात प्रलंबित आहे.दिनांक 03/04/2025 रोजी षेवगाव येथील माझे परिचयाचे श्री.अभिशेक जगताप यांची षेवगाव येथे भेट झाली त्यावेळी मी त्यांना माझे डंपर वाहनाबाबत सांगितले असता त्यांनी प्रांत कार्यालय,पाथर्डी येथे माझी ओळख आहे मला तुमचे डंपरची कागदपत्रे दया,मी प्रांत कार्यालयात जावुन डंपर सोडवण्यासाठी तेथील कर्मचा-यांची भेट घेवुन तुम्हाला निरोप देतो असे म्हणाल्याने मी डंपरची कागदपत्रे त्यांचेकडे दिली त्यानंतर श्री. जगताप यांनी मला फोन करून सांगितले कि,त्यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयातील कारकुन मोडसे मॅडम यांचेषी संपर्क केलेला असुन डंपर वाहन सोडण्याचा अंतिम आदेष देण्याच्या प्रक्रियेत मदत करण्याकरीता 7500/- रूपये मागत आहे.तुम्ही मला 7500/-दया.मी सदरचे पैसे मोडसे मॅडमला देवुन तुमचे डंपर वाहन सोडण्याचा अंतिम आदेष त्यांचेकडुन तयार करून घेवुन पुढील आठवडयात तुम्हाला देतो,माझे डंपर वाहन सोडण्याच्या आदेषाकरीता प्रांत कार्यालय,पाथर्डी येथे कोणतीहि षासकीय देण्याची आवष्यकता नाही हे मला माहित आहे त्यावेळी माझे लक्षात आले कि,श्री.जगताप हे माझे डंपर वाहन सोडण्याचे आदेष देण्याकरीता उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथर्डी येथील कारकुन मोडसे मॅडम यांचेसाठी 7500/-लाचेची मागणी करत आहे. तरी मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही.आज रोजी श्री.जगताप यांनी मला प्रांत कार्यालय,पाथर्डी येथे भेटण्याकरीता बोलावले आहे.त्यावेळी मी त्यांना तसेच त्यांचे मार्फतीने मोडसे मॅडम यांना भेटणार आहे.त्यावेळी त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेषीर कारवाई करावी."वगैरे मजकुरची तक्रार सांगितली. मी सांगितलेली तक्रार माझ्या स्वहस्ताक्षरात

लिहुन देण्यास पोनि.आल्हाट यांनी मला सांगितले.त्यावरून मी माझ्या स्वहस्ताक्षरात सविस्तर तक्रार लिहुन दिली त्यावर मी,दोन्ही पंचांनी व पोनि आल्हाट यांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर माझ्या तक्रारीवरुन खाजगी इसम अभिशेक जगताप यांची लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले.पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी लाच मागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकाॅर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत मला व पंचांना माहिती समजावून सांगितली.पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी व्हाईस रेकाॅर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालुन,व्हाईस रेकाॅर्डर चालु करून,त्या मेमरीकार्ड मध्ये काहीही रेकाॅर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली.त्यानंतर पोनि आल्हाट यांनी व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून त्यामध्ये मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेकामी पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट,दोन्ही पंच व मी असे उपस्थित असलेबाबत निवेदन रेकाॅर्ड केले.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर खाजगी इसम जगताप हे मला पाथर्डी येथे आल्यानंतर फोन करणार असल्याचे मी पोनि आल्हाट यांना कळविले त्यावेळी खाजगी इसम जगताप यांचा फोन येण्याची वाट पाहण्याचे सर्वानुमते ठरले त्यानंतर खाजगी इसम जगताप यांचा त्यांचे 8552804864 या मोबाईल क्रमांकावरून माझ्या 9765910123 या मोबाईल क्रमांकावर 13/36 वा.चे सुमारास फोन आला त्यावेळी पोनि आल्हाट यांचे सुचनेप्रमाणे मी फोनचा स्पीकर आॅन केला व पोनि आल्हाट यांनी व्हाॅईस रेकाॅर्डर चालु केला. त्यावेळी खाजगी इसम जगताप यांनी माझे कामासंदर्भात चर्चा केली. त्यावेळी खाजगी इसम जगताप यांनी पाथर्डी प्रांत कार्यालयातील मोडसे मॅडम यांना भेटल्याचे सांगुन मोडसे मॅडम यांनी 7000/- रुपयामध्ये काम करुन देतील असे सांगुन ते 7000/- रुपये प्रांत साहेब व मोडसे मॅडम यांचेकरीता असल्याचे सांगितले. त्यानंतर खाजगी इसम जगताप यांनी माझेकडे मोडसे मॅडम यांना दिनांक 04/05/2025 रोजी देणेकरीता 3000/- रुपये लाचेची मागणी केली.व उर्वरीत रक्कम काम झाल्यानंतर देणेबाबत कळविले त्यावेळी मी त्यांना मोडसे मॅडम यांची भेट घालुन देण्याकरीता सांगितले असता त्यांनी भेट घालुन देण्यास नकार दिला व माझे मित्र पप्पु गर्जे यांना फोन करुन विचारुन घ्या असे सांगुन फोन कट केला. खाजगी इसम जगताप हे मोडसे मॅडम यांची भेट घालुन देण्याकरीता नकार देत असल्यामुळे पुन्हा काही वेळाने 13/48 वा.चे सुमारास माझ्या 9765910123 या मोबाईल क्रमांकावरून खाजगी इसम यांच्या 8552864864 या मोबाईल क्रमांकावर फोन केला त्यावेळी पोनि आल्हाट यांचे सुचनेप्रमाणे मी फोनचा स्पीकर आॅन केला व पोनि आल्हाट यांनी व्हाॅईस रेकाॅर्डर चालु केला. खाजगी इसम जगताप यांनी मला पाथर्डी प्रांत कार्यालय येथे मोडसे मॅडम यांची भेट घेण्याकरीता बोलावले.व खाजगी इसम जगताप सांगितले कि,त्यांचेकडील 3000/- रूपये माझे कामासाठी मोडसे मॅडमला दिलेले आहेत व सदरचे 3000/- रूपये देवुन टाका असे कळविल्यानंतर पोनि आल्हाट यांनी व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करुन तो माझे ताब्यात दिला.पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांचे सुचने प्रमाणे मी पंच नं.1 यांचेसह माझे दुचाकी वाहनाने खाजगी इसम जगताप व लोकसेवक मोडसे मॅडम यांची भेट घेण्याकरीता उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथर्डी येथे 13/54 वा.चे सुमारास रवाना झालो.

मी व पंच नं.1 असे उपविभागीय अधिकारी कार्यालयाचे आवारात गेलो असता तेथे खाजगी इसम जगताप यांची भेट झाली. त्यावेळी खाजगी इसम जगताप यांचे सोबत कामासंदर्भात चर्चा केली व त्यावेळी खाजगी इसम जगताप यांनी माझे कामासाठी मोडसे मॅडम यांना 7000/- रूपये दयायचे असल्याचे सांगुन त्यापैकी 3000/- रूपये मोडसे मॅडमला दिलेले आहेत ते खाजगी इसम जगताप यांनी माझेकडे मागितले त्यावेळी मी त्यांना मोडसे मॅडम यांची भेट घेण्याकरीता जावु असे सांगितल्यानंतर आम्ही पंच नं.1 यांचेसह प्रांत कार्यालयातील मोडसे मॅडम यांची भेट घेतली. त्यावेळी मोडसे मॅडम यांनी माझे सोबत कामा संदर्भाने चर्चा केली. त्या दरम्यान मोडसे मॅडम यांनी त्यांचेकरीता तसेच प्रांत साहेब यांचेकरीता कसल्याही प्रकारे लाचेची मागणी केली नाही. त्यानंतर आम्ही प्रांत कार्यालयातुन बाहेर आलो. त्यानंतर पुन्हा खाजगी इसम जगताप यांचे सोबत कामा संदर्भाने चर्चा झाली. त्यानंतर मी पंच नं.1 यांचेसह सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 14.26 वा. चे सुमारास परत आलो. त्यावेळी पोनि आल्हाट यांनी माझ्या ताब्यातील व्हाॅईस रेकाॅर्डर ताब्यात घेवुन तो बंद केला.

त्यांनतर मी व पंच क्र.1 यांनी वरील घडला प्रकार पोनि आल्हाट यांना पंच क्र.2 यांचे समक्ष सांगितला तसेच पोनि आल्हाट यांनी व्हाॅईस रेकाॅर्डरमधील रेकाॅर्ड झालेले संभाशण ऐकले असता खाजगी इसम जगताप यांनी माझे डंपर वाहन सोडण्याचे आदेषाचे प्रक्रियेत मदत करण्याकरीता मोडसे मॅडम यांचेकरीता माझेकडे 7000/- रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी 3000/- रुपये खाजगी इसम जगताप यांनी मोडसे मॅडम यांना माझे कामाकरीता दिल्याचे सांगुन सदरची 3000/- रूपयांची माझ्याकडे मागणी करून स्वीकारण्याचे मान्य करून माझेकडे लाचेची

मागणी केल्याचे तसेच उर्वरीत रक्कम माझे काम झाल्यानंतर स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.
लाच रक्कम देण्याचे ठिकाण निष्चीत करण्याकरीता खाजगी इसम जगताप यांना फोन करण्याचे ठरले. त्याप्रमाणे पोनि आल्हाट यांनी व्हाॅईस रेकाॅर्डर चालु केला व मी माझ्या 9765910123 या मोबाईल क्रमांकावरून खाजगी इसम यांच्या 8552864864 या मोबाईल क्रमांकावर फोन केला स्पीकर आॅन केला. त्यावेळी खाजगी इसम जगताप यांनी ते षेवगांव येथे गेल्याचे सांगुन ते पुन्हा पाथर्डीला येणार नसल्याचे सांगितले व फोन कट केला. त्यानंतर खाजगी इसम जगताप हे षेवगाव येथे कोणत्या ठिकाणी थांबणार आहेत याची माहिती घेण्याकरीता पोनि आल्हाट यांचे सुचनेवरून पुन्हा मी माझ्या 9765910123 या मोबाईल क्रमांकावरून खाजगी इसम यांच्या 8552864864 या मोबाईल क्रमांकावर फोन करून स्पीकर आॅन केला व पोनि आल्हाट यांनी व्हाॅईस रेकाॅर्डर चालु केला त्यावेळी खाजगी इसम जगताप यांना मी दुपारी 04.30 वा. पर्यत षेवगांव येथे येणार असल्याचे सांगितले. त्यावेळी खाजगी इसम जगताप यांनी षेवगांव तहसिल कार्यालय येथे येण्यास सांगुन आता 3000/- रुपये देणेस सांगितले व उर्वरीत रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर देण्यास सांगितले. त्याप्रमाणे खाजगी इसम जगताप यांना षेवगांव तहसिल कार्यालय येथे लाच म्हणुन 3,000/-रुपये रक्कम देण्याचे सर्वानुमते ठरले.
त्यानंतर सापळा लाच रक्कम म्हणुन देण्यासाठी मी माझ्या बचतीतुन 3000/- रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 06 भारतीय चलनी नोटा, अषी रक्कम हजर केली.पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी सदर सापळा कारवाईमध्ये अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पोना काळे यांनी करून दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्यात आली,एका कोÚया कागदावर त्या नोटाचे नंबर लिहुन घेण्यात आले व सदर लाच रक्कम खाजगी इसम जगताप यांना देण्याकरीता माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवुन दिली.पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी सापळा कारवाई बाबत मला व सापळा पथकास आवष्यक त्या सुचना दिल्या.त्यानंतर खाजगी इसम जगताप यांचेविरूध्द तहसिल कार्यालय, षेवगांव येथे लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरले. त्यानंतर मी माझे दुचाकी वाहनाने षेवगांव येथे सुरक्षित ठिकाणी गेलो. तसेच पोनि आल्हाट, दोन्ही पंच व सापळा पथकातील अंमलदार हे त्यांचेकडील षासकीय वाहनाने षेवगांव येथे सुरक्षित ठिकाणी आले.
त्यानंतर पोनि श्री.आल्हाट यांनी व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकाॅडर चालु करून माझ्या ताब्यात दिले.त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे माझ्या दुचाकी वाहनावरून 17ः21 वा. रवाना झालो व पोनि आल्हाट, पंच क्र. 2 व सापळा पथक असे षासकीय वाहनाने आमचे मागोमाग आले, मी व पंच नं.1 असे षेवगांव तहसिल कार्यालयाचे गेटचे बाहेर येवुन थांबलो. त्याठिकाणी खाजगी इसम जगताप उभे असल्याचे दिसले. त्यानंतर सापळा पथक आमचे पाठोपाठ आल्याची खात्री केली. त्यावेळी मी व पंच नं.01 असे खाजगी इसम जगताप यांचे समोर गेलो. त्यावेळी खाजगी इसम जगताप हे दया ना ते असे मला म्हणाले. त्यावेळी मी माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवलेली 3000/- रूपये लाच रक्कम उजव्या हाताने काढुन खाजगी इसम जगताप यांना देण्यासाठी त्याचेसमोर धरून मोजुन घ्या असे म्हणालो असता खाजगी इसम जगताप यांनी लाच रक्कम 3000/- रुपये मोजुन घेतली व पॅन्टचे समोरील उजव्या खिषात ठेवली त्यानंतर माझेत व खाजगी इसम जगताप यांचेत कामा संदर्भात चर्चा झाली. त्यावेळी मी खाजगी इसम जगताप यांनी लाच स्वीकारल्याचा नियोजित इषारा केला. ती वेळ 17ः26 वा. दरम्यानची होती. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट, पंच क्र.2 व सापळा पथक तेथे आले व खाजगी इसम जगताप यांना लाच रकमेसह रंगेहाथ पकडले व पंच नं.02 करवी खाजगी इसम जगताप यांनी स्विकारलेली लाच रक्कम हस्तगत केली.

त्यावेळी पोनि आल्हाट यांनी खाजगी इसम जगताप यांना त्यांचे नाव, गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अभिशेक दत्तात्रय जगताप, वय-35 वर्षे, रा.षास्त्रीनगर, षेवगांव, ता.षेवगांव, जि.अहिल्यानगर असे सांगीतले. त्यावेळी पोनि आल्हाट यांनी खाजगी इसम जगताप यांना षासकीय वाहनात नेले. त्यानंतर षासकीय वाहनात अंधार करुन खाजगी इसम जगताप यांच्या आवष्यक त्या तपासण्या केल्या. त्यानंतर मला पोनि आल्हाट यांनी षासकीय विश्रामगृह, पाथर्डी येथे येण्यास सांगीतले व पोनि आल्हाट व त्यांचे सापळा पथक पुढील कामकाज करणेकामी खाजगी इसम जगताप यांना घेवुन षासकीय विश्रामगृह, पाथर्डी येथे आले व मला दिलेल्या सुचनाप्रमाणे मी माझ्या वाहनाने षासकीय विश्रामगृह पाथर्डी येथे आलो. त्याठिकाणी सापळा पथकाने त्यांचे पुढील कामकाज केले.

तरी दि.04/04/2025 रोजी 13ः26 वा. ते 15ः12 वा.च्या दरम्यान लाचमागणी पडताळणी वेळी उपविभागीय अधिकारी कार्यालय,पाथर्डी भाग,पाथर्डी येथे खाजगी इसम जगताप यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथर्डी भाग, पाथर्डी येथे माझे डंपर वाहन सोडण्याचे आदेषाचे प्रक्रियेत मदत करण्यासाठी मोडसे मॅडम

यांचेकरीता माझेकडे 7000/- रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी 3000/- रुपये स्वीकारण्याचे मान्य करुन उर्वरित रक्कम माझे काम झाल्यानंतर स्विकारणार असल्याचे मान्य केले आहे. तसेच सापळा कारवाई वेळी 17○:21 ते 17○:26 वा. दरम्यान खाजगी इसम जगताप यांनी सदरची लाच रक्कम माझेकडुन षेवगांव तहसिल कार्यालयाचे गेटचे बाहेर पंचासमक्ष स्विकारली म्हणुन खाजगी इसम अभिशेक दत्तात्रय जगताप, वय 35 वर्षे, धंदा- खाजगी नोकरी, रा.षास्त्रीनगर, षेवगांव, ता.षेवगांव,जि.अहिल्यानगर यांचे विरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष हे लिहून दिले.

( काझी मसुद खलील )

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:** **(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

santosh ramchandra mutkule(I (Inspector)) / **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.** **(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
पाथर्डी पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** santosh ramchandra
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**